स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**Government Of Maharashtra**

महाराष्ट्र शासन

**Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai**

उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,

Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.

विकास सेटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.

Tel.No. 25206199/25208182

Email: didic.mumbai@maharashtra.gov.in

दिनांक :- २३.०६.२०२३.

## :- मुंबई उपनगर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक ०८.०६.२०२३ चे इतिवृत्त -:

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठीत करण्याबाबत, शासन, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्रमांक निप्रप-२०२०/ प्र.क्र. २८/ उद्योग-७, दिनांक १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई उपनगराकरिता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आले आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व उद्योजकांना येणा-या अडचणीचे निराकरण करण्याकरिता तसेच जिल्हयातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा, समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरिता मुंबई उपनगराकरिता उपक्रम राबविण्याबाबत जिल्हा निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८.०६.२०२३ रोजी दुपारी ०४.३० वाजता मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय, प्रशासकीय भवन, ९ वा माळा, वांद्रे (पूर्व), मुंबई. ४०० ०५१. येथे संपन्न झाली.

१. सर्वप्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करुन निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई उपनगर जिल्हयाकरिता स्थापन क आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत तसेच मुंबई उपनगराकरिता एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी, निर्यात प्रोत्साहनाकरिता तसेच निर्यातवाढीकरिता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रस्तावित निर्यातसंबंधी इत्यादी काही अडचणी असल्यास त्याबाबत कळविण्याबाबत निर्देश दिले.

२. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

| क्रमांक | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे |
| --- | --- | --- |
| १. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. ०१ | मुंबईला जागतिक स्तरावर युनिकॉर्नची गरज असल्याने शासनाने स्टार्टअप्समध्ये मार्गदर्शन केल्यास उत्पादनांच्या तुलनेत प्रचंड महसूल शासनास प्राप्त होईल. शासनाने एक जिल्हा एक उत्पादन सोबत एक जिल्हा एक सेवा संकल्पना विकसित केल्यास संस्थेच्या इनपूटसह सहभागी होणार असल्याचे नमूद केले आहे. तसेच एमएसएमई अंतर्गत काम करणा-या अकुशल कामगारांसाठी अद्ययावत कौशल्य तयार करण्याबाबत तसेच त्यासंदर्भात कौशल्य विभागाच्या महाराष्ट्र नोडल एजन्सीला सर्वतोपरी सहकार्य करण्याचे नमूद केले आहे. बंद पडलेल्या तसेच आजारी उद्योगांना पुनरुज्जीवीत करुन आर्थिक समावेशन प्रणाली सुधारण्याबाबत नमूद केले आहे. तसेच सबसिडीकरिता क्लेम करणे. |
| २. | संचालक, सागरी उत्पादन निर्यातक, योगक्षेम, फलॅट क्रमांक ६०५, रिजेन्ट चेंबर्स, ६ वा मजला, जमनालाल बजाज रोड, नरीमन पॉईंट, मुंबई. | एक जिल्हा एक उत्पादन या अंतर्गत खाद्य मेळावा तसेच जहाज मेळावा आयोजन करणे, तसेच आंतरराष्ट्रीय खरेदीदार व विक्रेते यांचेप्रकरणी पाठपुरावा करुन त्यांचेकरिता कार्यशाळा आयोजन करण्याबाबत निर्देशित करण्यात आले. जीआय मॅपिंग करिता सहाय्य करणे. |
| ३. | वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अन्स्ट अँड यंग एलएलपी, ५ वा मजला, ब्लॉक बी, निरलॉन नॉलेज पार्क, गोरेगांव, मुंबई. ४०००६३. | एक जिल्हा एक उत्पादन करिता तसेच निर्यात प्रोत्साहनाकरिता उपस्थित असलेल्या सर्व संस्था यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने करण्यात येणा-या कार्यवाहीबाबत तसेच Export Promotion करण्याकरिता उपाययोजना आखण्याबाबत होणा-या चर्चासत्र तसेच प्रदर्शनानुसार मा.जिल्हाधिकारी यांनी वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अन्स्ट अँड यंग एलएलपी यांना आदेशित केल्यानुसार कृती आराखडयामध्ये बदल करणे. |
| ४. | सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई उपनगर, वांद्रे (पूर्व), मुंबई. ४०००५१. | एक जिल्हा एक उत्पादन करिता तसेच निर्यात प्रोत्साहनाकरिता त्यांचेकडे असलेली सुधारीत माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देशित करण्यात आले. |

मुंबई उपनगराकरिता प्रस्तावित निर्यात प्रचालन समिती बैठकीमध्ये झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने कार्यवाही होण्याकरिता मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी निर्यातीमध्ये संबंधित असणाऱ्या स्टेक होल्डर यांचेकरिता निर्यात प्रोत्साहन परिषद, जिल्हा उद्योग केंद्र तसेच भारतीय निर्यात संस्था फेडरेशन यांचे समवेत एकत्रितपणे निर्यातदारांकरिता चर्चासत्र तसेच प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करुन Capacity Building Programme करिता IEC अंतर्गत All EPC करिता IEC कॅम्प लावण्याबाबत भारतीय निर्यात संस्था फेडरेशन, (एफआयईओ), टाईम्स स्क्वेअर तसेच सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर यांनी संयुक्तपणे सहाय्य करण्याबाबत निर्देशित करण्यात आले.

तसेच सदर समिती अंतर्गत निर्यातीसंदर्भात बैठकीस उपस्थित असलेल्या संस्थेस तसेच इतर अन्य संस्थेस काही अडचणी असल्यास त्याचे निराकरण करणे व त्याबाबत माहिती उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई कार्यालयास सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

सही/-
उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा
सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती

सही/-
मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष
जिल्हा निर्यात प्रचालन समिती

- <u>बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य</u> :-

| | |
|---|---|
| १. | मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अध्यक्ष जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| २. | उद्योग उप संचालक (मुंप्रावि) तथा सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ३. | उद्योग अधिकारी (मुंप्रावि), जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई उपनगर, मुंबई. |
| ४. | जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया,बँक ऑफ इंडिया बिल्डिंग, २ रा मजला, नटराज मार्केटसमोर, एस.व्ही.रोड, मालाड (पश्चिम), मुंबई. |
| ५. | संचालक, ऑल इंडिया असोसिएशन ऑफ इंडस्ट्रिज, न्यु एक्सेलसियर बिल्डींग, ६ वा मजला, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई. |
| ६. | संचालक, सागरी उत्पादन निर्यातक, योगक्षेम, फलॅट क्रमांक ६०५, रिजेन्ट चेंबर्स, ६ वा मजला, जमनालाल बजाज रोड, नरीमन पॉईंट, मुंबई. |
| ७. | वरिष्ठ प्रकल्प सल्लागार, अर्न्स्ट अँड यंग एलएलपी, ५ वा मजला, ब्लॉक बी, निरलॉन नॉलेज पार्क, गोरेगांव, मुंबई. |
| ८. | सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय विभाग, मुंबई उपनगर, ७ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई. ४०००५१. |
| ९. | सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मुंबई उपनगर, फोर्ट, मुंबई. |

क्रमांक उससं/मुंप्रावि/मुंबई उपनगर/जिनिप्रस/बैठक/२०२३/ दिनांक :-

प्रत माहितीस्तव सादर :-

१. मा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर
२. बैठकीस उपस्थित कार्यबल समिती सदस्य, मुंबई उपनगर.